मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अखेर निलेश चव्हाणला नेपाळमधून अटक

## पिंपरी- चिंचवड पोलिसांची कामगिरी : नेपाळे सीम वापरून राहत होता चव्हाण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड पोलिसांनी अखेर वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील निलेश चव्हाणला नेपाळमधून बेड्या ठोकल्या आहेत. निलेश चव्हाणचा पोलिसांनी शोध सुरू केल्यानंतर पुण्याहून दिल्ली, दिल्लीहून गोरखपूर आणि तिथून नेपाळ गाठल असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. निलेश चव्हाण हा पोलिसांच्या हाती लागत नव्हता. परंतु, तांत्रिकदृष्ट्या तपासंती त्याला आज बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सहा पथक निलेश चव्हाणचा शोध घेत होते. प्रामुख्याने गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखा युनिट चार आणि सायबरचे पोलीस अधिकारी, कर्मचारी शोध घेत होते. निलेश चव्हाण हा नेपाळ भारत सीमेवरून वीस किलोमीटर आत असल्याची माहिती मिळाली होती. सायबर पोलिसांच्या च्या मदतीने पिंपरी- चिंचवड पोलीस तिथपर्यंत पोहोचले. निलेश चव्हाण हा भारतीय मोबाईल किंवा सिम कार्ड वापरत नव्हता. यामुळे त्याच्यापर्यंत पोहोचणे अशक्य झालं होतं. निलेश चव्हाण नेपाळमधील सिम कार्डद्वारे तिथलं इंटरनेट वापरत असे. अखेर सायबरच्या मदतीने पिंपरी- चिंचवड पोलीस त्याच्यापर्यंत पोहोचले. तो एकटाच राहत होता. परंतु, नेपाळमधील सिम कार्डद्वारे तो कुणाच्या संपर्कात होता, याबाबत पोलीस तपास करत आहेत.

वैष्णवी हगवणे यांचं दहा वर्षाच बाळ त्याच्याकडे होत. हे बाळ आणण्यासाठी गेलेल्या कस्पटे कुटुंबातील सदस्यांना निलेश चव्हाणने पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावलं होतं. याप्रकरणी वारजे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अखेर याबाबत पोलिसांनी आणि प्रशासनाने हस्तक्षेप करत वैष्णवीच बाळ कस्पटे कुटुंबाच्या स्वाधीन केलं होतं. तेव्हा देखील अनोळखी व्यक्तीने ते बाळ रस्त्यावर कस्पटे कुटुंबाला दिलं होतं.



### नीलेश चव्हाणविरोधात पत्नीचीही तक्रार

» नीलेश चव्हाणविरोधात 2022 मध्ये वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. आपल्या पत्नीचे घरात स्पाय कॅमेऱ्याने चित्रीकरण केल्याचा आरोप त्याच्यावर होता. याप्रकरणी त्याच्या पत्नीनेच पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. नीलेशची पत्नी त्याच्यापासून विभक्त राहते.

# सुधारित विकास आराखड्याला थेरगाववासीयांचा विरोध!

## आमदार जगताप यांना निवेदन; अनावश्यक आरक्षण टाकल्यामुळे भूमिपुत्रांसह स्थानिकांवर अन्याय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या वतीने नवीन प्रस्तावित प्रारूप विकास आराखडा मंजूर केलेला आहे .यामध्ये थेरगावमधील समस्या खूपच बिकट व संभ्रम निर्माण करणारी झालेली आहे .या विकास आराखड्यामध्ये 24 मीटर, 15 मीटर, 12 मीटर, 9 मीटर याचबरोबर रिंग रोड , उद्याने शाळा अशी अनेक आरक्षणे आहेत. यामध्ये थेरगाव मधील भूमिपुत्र शेतकरी ,रहिवासी ,व्यापार वर्ग या सर्वांचेच कंबरडे मोडून टाकणारा हा प्रारप विकास आराखडा आहे.

याच अनुषंगाने चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांना थेरगावमधील सर्वसामान्य नागरिकांनी सभेसाठी आमंत्रित केलेले होते. थेरगावमधील न्यू इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये ही सभा आयोजित केलेली होती. या ठिकाणी नागरिक व महिला वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी स्थानिक नगरसेवक काळूराम बारणे, अभिषेक बारणे, तानाजी बारणे, मनीषा पवार, संतोष बारणे, मनोहर पवार, शुभम नखाते, संतोष बारणे, संदीप गाडे, न्यू इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष विजय पवार, अशोक मोरे तसेच स्थानिक नागरिक नरेंद्र माने, हरीश पाठक, प्रताप डुंबरे, अक्षय कांबळे, विजय माने, दीपक तरडे, यशवंत माने, रुपेश गोरे, अक्षय पाटील महिलांनी आपली व्यथा व मनोगत व्यक्त केले.



### एकही घर पाडू देणार नाही : आमदार जगताप

» स्थानिक नगरसेवकांनी आमदार साहेबांसमोर विकास आराखडा रद्द करावा .कारण थेरगाव मध्ये विकासाच्या बाबतीत भरपूर सुविधा आहेत तसेच स्थानिक नगरसेवक हा निर्धार केला आहे थेरगाव मधील एकही बांधकाम पाडले तर आम्ही निवडणूक लढवणार नाही. या सर्वांच्या मागणी व व्यथा ऐकून आमदार साहेबांनी नागरिकांना मार्गदर्शन केले जास्तीत जास्त नागरिकांनी हरकती फॉर्म भरून महानगरपालिका ऑफिसमध्ये जमा करण्यास सांगितले व सर्व नागरिकांना आश्वासन दिले आहे थेरगाव मधील एकही घर पडून देणार नाही व इथून पुढे सर्वांना प्रॉपर्टी कार्ड मिळवून देण्याचे सुद्धा आश्वासन दिले आहे.

# एनडीएतून पहिली महिला अधिकाऱ्यांची बॅच पासआऊट

## ऐतिहासिक! तीन वर्षांच्या खडतर प्रशिक्षणानंतर देशाच्या सेवेसाठी सज्ज

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे (एनडीए) आज (३० मे) दीक्षान्त संचलन (पासिंग आउट परेड) पार पडले आहे. हे दीक्षान्त संचलन ऐतिहासिक ठरले आहे. कारण यावेळी १४८ व्या तुकडीचं संचलन हे 'एनडीए'मधील महिला छात्रांनी केलं असून महिला छात्रांची पहिली तुकडी यंदा उत्तीर्ण झाली आहे. यावेळी माजी लष्करप्रमुख तथा मिझोरामचे राज्यपाल व्ही.के.सिंग यांच्याकडून या संचलनाची पाहणी करण्यात आली आहे.



दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये दिलेल्या निर्णयानंतर महिलांना 'एनडीए'मध्ये प्रवेश देण्यास सुरुवात झाली. त्यानुसार २०२२ मध्ये 'एनडीए'साठीच्या प्रवेश प्रक्रियेत पात्र ठरलेल्या महिला छात्रांना 'एनडीए'मध्ये प्रवेश देण्यात आला. त्यानंतर जवळपास तीन वर्षांचं खडतर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर या महिला छात्रांची पहिली तुकडी आता उत्तीर्ण झाली असून देशाच्या सेवेसाठी सज्ज झाली आहे.

'एनडीए'चा पदवी प्रदान सोहळा पार पडला असून जनरल (नि.) व्ही.के.सिंग हे दीक्षान्त संचलनाला 'पासिंग आउट परेड'ला उपस्थित होते. यावेळी त्यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या छात्रांना पदक प्रदान करण्यात आले. तसेच यावेळी व्ही.के.सिंग यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमीतील महिला छात्रांना मार्गदर्शन देखील केलं. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.

दरम्यान, पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत (एनडीए) १४८ व्या तुकडीमध्ये महिला छात्रांनी तीन वर्षांचं खडतर प्रशिक्षण घेतलं आहे. या तीन वर्षांच्या खडतर प्रशिक्षण काळात या रणरागिणींनी अनेक अडथळ्यांचा सामना केला. यानंतर आता त्या पासआऊट झाल्या असून आता त्या देशाच्या सेवेसाठी सज्ज झाल्या आहेत. या बरोबरच यावेळी ३०० पेक्षा जास्त पुरुष छात्र देखील एनडीएतून ग्रॅज्युएट होत आहेत.

### व्ही.के.सिंग यांनी काय म्हटलं?

» "आज अकादमीच्या इतिहासात एक अनोखा आणि महत्त्वाचा दिवस आहे. आज एनडीएमधून महिला छात्रांची पहिली तुकडी उत्तीर्ण झाली आहे. हा आमच्या प्रवासातला एक ऐतिहासिक टप्पा आहे, जो सर्वसमावेशकता आणि सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या तरुणी 'नारी शक्ती'चे प्रतीक आहेत. ज्या केवळ महिला विकासाचेच नव्हे तर महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचे प्रतीक आहेत", असं व्ही.के.सिंह यांनी म्हटलं आहे.

# पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासंदर्भात 794 हरकती

## सुमारे 2673 हेक्टर जमिनीच्या संपादनासाठी विरोध; लवकरच मोबदल्याच्या पॅकेजची घोषणा



**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी सात गावांमधून ७९४ हरकती जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या असून, दोन शेतकऱ्यांनी जागा देण्याबाबतीची संमती जिल्हा प्रशासनाला दिली आहे. दरम्यान, भूसंपादनाच्या मोबदल्यासंदर्भात सरकारच्या पातळीवर चर्चा सुरू झाली असून, येत्या काही दिवसांत पॅकेजची घोषणा होण्याची शक्यता आहे.

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावांतील सातबारा उताऱ्यांवर भूसंपादनाच्या शेऱ्यांची नोंद करण्याची प्रक्रिया जिल्हा प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. याबाबतच्या नोटिसा बजाविण्यात आल्या असून, त्यासंदर्भातील हरकती आणि सूचना २९ मेपर्यंत लेखी स्वरूपात देता येणार आहेत. त्यानंतर हरकती-सूचनांवर सुनावणी होऊन भूसंपादनाचा निर्णय घेण्यात येणार आहे.

विमानतळासाठी वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधील २ हजार ६७३ हेक्टरचे भूसंपादन केले जाणार आहे. भूसंपादनाबाबत ३० मेपर्यंत हरकती नोंदविता येणार आहे. आतापर्यंत ७९४ शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या आहेत. यानंतर या हरकतीवर सुनावणी घेतली जाणार आहे. तर, वनपुरी येथील शेतकऱ्यांनी हरकती मांडण्यासाठी अजून १० दिवसांची मुदत वाढवून देण्याची मागणी केली आहे. पुरंदरमधील या सात गावांमधील साडेचार हजार शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर एमआयडीसीचे शिक्के पडले आहेत. यातील तीन हजारांपेक्षा जास्त शेतकरी पूर्णपणे भूमिहीन होणार आहेत.

दरम्यान, भूसंपादनाला सर्व सात गावांतील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. भूसंपादनासाठी करण्यात येणाऱ्या ड्रोन सर्वेक्षणाविरोधात शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला होता. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बाधित शेतकऱ्यांची भेट घेऊन भूसंपादनाच्या मोबदल्याबाबत सात दिवसांत प्रस्ताव देण्यास सांगितले होते. तसा प्रस्ताव न आल्यास राज्य सरकार १५ दिवसांत राज्य सरकार वेगवेगळ्या कायद्यानुसार मोबदल्याचे पॅकेजचा प्रस्ताव देईल, असे जाहीर केले होते. त्यानुसार येत्या काही दिवसांत पॅकेज जाहीर होण्याची शक्यता आहे.

### या गावांत भूसंपादन

» वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधील २ हजार ६७३ हेक्टरचे भूसंपादन होणार

» या सात गावांमधील साडेचार हजार शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर एमआयडीसीचे शिक्के पडले आहेत. यातील तीन हजारांपेक्षा जास्त शेतकरी पूर्णपणे भूमिहीन होणार आहेत.

» आतापर्यंत ७९४ शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या आहेत. वनपुरी येथील शेतकऱ्यांची हरकती मांडण्यासाठी अजून १० दिवसांची मुदत वाढवून देण्याची मागणी

# वारकऱ्यांची पिंपरी चिंचवडमधील वाट खडतर

## शहरातील पुणे-मुंबई महामार्गावर सुरू असलेल्या कामांमुळे रस्ता अरुंद झाला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर सुरू असलेल्या मेट्रो व इतर कामांमुळे रस्ता अरुंद झाला आहे. यामुळे पालखी रथ व वारकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचा पायी पालखी सोहळा जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरातील मार्गावर विविध ठिकाणी कामे सुरू आहेत. जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर अर्बन स्ट्रीट, जलवाहिनी आणि महामेट्रोचे काम सुरू आहे. त्यासाठी खोदाई केली असून, रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे वारकऱ्यांना अडचणींना सामोरे जात खडतर मार्गातून वाट काढावी लागणार आहे. पालखी सोहळ्यापूर्वी पिंपरी ते निगडी मार्गावरील मेट्रोचे काम आठ दिवस बंद करण्याची मागणी देहू संस्थानने केली आहे.

श्री संत तुकाराम महाराजांच्या ३४०व्या पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान १८ जून रोजी होणार आहे. १९ जून रोजी पालखी पिंपरी-चिंचवड शहरात मुक्कामी असेल. आकुर्डीत एक दिवस पालखीचा मुक्काम असतो. तर, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी २० जून रोजी शहरातून पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे. देहूगाव ते देहूरोड दरम्यान पालखी मार्ग अरुंद आहे. त्यामुळे संत तुकाराम महाराजांच्या पालखीतील वारकऱ्यांना पायी चालताना अडचणींना सामोरे जावे लागते. या मार्गाचे रुंदीकरण करण्याची अनेक वर्षांची वारकऱ्यांची मागणी अपूर्णच आहे.

पालखी जुन्या पुणे-मुंबई महामार्ग मार्गे निगडीतील भक्ती-शक्ती चौकात दाखल होते. महापालिकेकडून येथे पालखीचे स्वागत केले जाते. परंतु, येथे महामेट्रोच्या कामासाठी खोदाई केली आहे. ही खोदाई पुढे पिंपरीपर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे पालखी रथ, वारकऱ्यांना चालताना अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे पालखी सोहळ्यापूर्वी मेट्रोचे काम आठ दिवस बंद करण्याची मागणी देहू संस्थानने केली आहे. दरम्यान, श्री क्षेत्र आळंदी संस्थान, श्री क्षेत्र देहू संस्थान, महाराष्ट्र वारकरी महामंडळ, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर ट्रस्टसोबत महापालिका प्रशासनाने बैठक घेतली व तयारीची माहिती दिली.



### संस्थानच्या सूचना

» पालखी मार्गावर दिशादर्शक फलक, पिंक टॉयलेटची व्यवस्था, मोटार सायकल रुग्णवाहिका, पुरेसे स्वच्छता, स्नानगृहे उपलब्ध करून द्यावीत. मोकाट जनावरांचा बंदोबस्त, सुरक्षा कठड्यांची व्यवस्था, काम सुरू असलेल्या ठिकाणी संरक्षक उपाययोजना कराव्यात. वृक्ष फांद्यांची छाटणी, पालखी मार्गावर, मुक्कामाच्या ठिकाणी पाणी तुंबणार नाही याची खबरदारी घ्यावी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना संस्थानने केल्या.

### महापालिका, पोलीस आयुक्तांकडून पाहणी

» पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पालखी मार्गाची पाहणी केली. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी असलेल्या वाहनतळाच्या जागांसंदर्भातील फलक, महापालिकेमार्फत वारकऱ्यांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधांसंदर्भातील फलक, पालखी मार्गावर दिशादर्शक फलक दर्शनी भागात लावावेत, अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

“ सुविधांमध्ये कमतरता राहणार नाही. पालखी मार्गावर पावसाचे पाणी कोठेही तुंबणार नाही. मार्गावरील खड्डे बुजविण्याच्या सुरू असलेल्या कार्यवाहीचा वेग वाढविण्याच्या सूचना दिल्या आहेत. वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# मावळात कृषी प्रकल्पांची उभारणी करा : आमदार सुनील शेळके

## कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्पाची आढावा बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत मावळ तालुक्याच्या कृषी विकासावर लक्ष केंद्रीत करत आमदार सुनील शेळके यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्वपूर्ण मागण्या मांडल्या.

मावळ तालुक्यात शीतगृह, सेंद्रीय शेती, इंद्रायणी तांदूळ आणि गुलाब फुलांवर प्रक्रिया करणारी केंद्रे उभारण्यासाठी आवश्यक जागा शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार शेळके यांनी कृषीमंत्र्यांकडे केली.

या प्रकल्पांतर्गत १२५० कृषी प्रकल्प मंजूर असून यामध्ये धान्य गोदाम, कांदा चाळ, शीतगृह, राइस मिल, ऑइल मिल, पशुखाद्य युनिट यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे मावळ तालुक्याला या योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा. जिल्हास्तरीय स्वतंत्र आढावा बैठक घेऊन मावळ तालुक्याचे प्रश्न मार्गी लावावेत, अशी विनंती आमदार शेळके यांनी कृषिमंत्र्यांकडे केली. स्मार्ट प्रोजेक्टमध्ये जे प्रस्ताव मंजूर झाले आहेत, त्यांना वेळेत निधी वितरित व्हावा आणि यासाठी टाईम आऊट मिळावा, अशीही सूचना त्यांनी केली.

या बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, प्रकल्प संचालक हेमंत वसेकर, राज्य वखार महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, कृषी व पणन विभागाचे प्रधान सचिव, कृषी विभागाचे संचालक, विविध विभागांचे अधिकारी आणि स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.



### कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प

» बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन या प्रकल्पांतर्गत राज्यात १२५० कृषी प्रकल्प मंजूर असून त्यापैकी ५५० प्रकल्प यशस्वीरित्या सुरू आहेत. यामध्ये धान्य गोदाम, कांदा चाळ, शीतगृह, राइस मिल, ऑइल मिल, पशुखाद्य युनिट यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. विशेष म्हणजे ३० टक्के प्रकल्प महिला शेतकरी भगिनींसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

“ मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळण्यास या प्रकल्पांमुळे मदत होणार असून स्थानिक आर्थिक व्यवहारांनाही चालना मिळणार आहे. शेतकऱ्यांना साठवणूक, प्रक्रिया आणि विक्रीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल.

- सुनील शेळके, आमदार, मावळ

# यंदा वारीसाठी दुप्पट वारकरी येणार

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी : नीरा नदीकाठच्या विसावा स्थळाची केली पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

यावर्षी आम्ही गेल्या वर्षी पेक्षा दुप्पट भाविक या वारी सोहळ्यामध्ये सहभागी होतील असा अंदाज धरून नियोजन केले आहे. आज आम्ही वारी मार्गावरील आणि पालखी विसावा स्थळांवर असलेल्या समस्या जाणून घेतलेल्या आहेत. काही अडीअडचणी आहेत त्या दूर करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिलेलेल्या आहेत. काही विषय असे आहेत की, ते लगेच दुरुस्त केले जातील.तर काही विषय असे आहेत की, जे लॉंग टर्म आहेत त्याच्या संदर्भात नियोजन करून ते मार्गी लावले जातील, असे आश्वासन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.



श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पुणे जिल्ह्यातील पालखीतळांची आणि पालखी महामार्गाची पाहणी करून मंगळवारी (दि. 27) दुपारी जिल्हाधिकारी पुणे जिल्ह्यातील शेवटचे विसावा स्थळ असलेल्या नीरा नदीकाठच्या विसावा स्थळावर पाहणीसाठी आले होते. यानंतर त्यांनी वारी सोहळ्याच्या तयारी याची माहिती माध्यमांना दिली. याप्रसंगी पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल आणि वारी सोहळा प्रमुख भावार्थ देखणे आदींसह विश्वस्त उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डुडी म्हणाले की, पालखी महामार्गावर सध्या रस्त्याचे काम सुरु आहे. विशेषतः दिवेघाटामध्ये रुंदी करणाचे काम सुरु आहे. त्या ठिकाणी पावसामुळे काही ठिकाणी रस्ता वाहून गेलेला आहे. त्या रस्त्याचे काम 10 जून पर्यंत पूर्ण करण्यास सांगण्यात आलेला आहे. सध्या पाऊस आहे पाऊस उघडल्यानंतर रस्त्यावर हॉट मिक्स डांबर टाकला जाईल. तो रस्ता वारकऱ्यांसाठी तयार केला जाईल. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य सेवा, स्वच्छतागृह यांची व्यवस्था करण्यात आली आहे. वाहतूक व्यवस्था देखील चांगली करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. गेल्या वेळेस पालखीला उशीर झाला होता.

यावर्षी पालखी सोहळ्या बरोबर चालणाऱ्या गाड्या या लवकरच पुढे पाठवल्या जातील दोन टप्प्यांमध्ये ही वाहतूक व्यवस्था करण्यात येणार आहे. रथा बरोबर वाहने सोडली जाणार नाहीत. त्यामुळे रथ वेळेवर पोहोचेल. दरवर्षीच्या अनुभवातून आपल्याला परफेक्ट नियोजन करता येणार आहे.

> यावर्षी पालखी सोहळ्यामध्ये सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाकडून 3000 पोलीस कर्मचारी यामध्ये अधिकारी, अंमलदार, पोलीस जवान तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर राखीव पोलीस दल होमगार्ड बंदोबस्तासाठी असणार आहेत. कोणत्याही प्रकारचा गुन्हा घडू नये म्हणून विशेष टीम देखील ठेवण्यात येणार आहे. फिरते पोलीस स्टेशन देखील या सोहळ्यामध्ये असणार आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी पोलीस पोलीस मदत केंद्र असणार आहे. महिला अधिकारी आणि अंमलदार देखील यामध्ये असणार आहेत. जवळपास 500 महिला पोलीस कर्मचारी बंदोबस्तला असणार आहेत.
>
> **- संदीपसिंह गिल्ल, पोलीस अधीक्षक**

> यावर्षी पाऊस लवकर आला आहे. त्यामुळे लोकांच्या पेरण्या लवकर उरणार आहेत. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या जन्माचे हे 750 व वर्ष आहे. त्यामुळे पर्व काळ पाहता या सोहळ्यामध्ये वारकऱ्यांची संख्या दीड पटीने वाढण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर पुण्यातून बाहेर पडताना रविवार म्हणजे सुट्टीचा दिवस असणार आहे. त्यामुळे पुरंदर तालुक्यात हा पालखी सोहळा येत असताना मोठी गर्दी होणार आहे.
>
> **- डॉ . भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख**

# सिंहगडावरील अतिक्रमण हटवण्यासाठी सक्त कारवाई सुरू

## यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नेमण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सिंहगड वगळता सर्व गडकिल्ले अतिक्रमण मुक्त असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच सांगितले होते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नेमण्यात आली आहे. सिंहगडावर सरकारी आणि खासगी मालमत्ता देखील आहे. सरकारी जागेवर अनेक स्थानिकांनी खाद्य विक्री आणि खेळणी, लिंबू सरबत, दही विक्रीचे स्टॉल उभारले होते.

यावर १९ नोव्हेंबर २०२२ रोजी मोठी कारवाई करण्यात आली होती. त्या नागरिकांनी एकत्रित येऊन वनविभागाच्या तात्पुरत्या संमतीने पुन्हा स्टॉल उभारले होते. तसेच गडावर खासगी मालमत्ता आहे. यातील काही जणांनी देखील अतिक्रमण केलेले निदर्शनास आले होते. यादरम्यान, खासगी मालमत्ता धारकांचे त्यांच्या मालकीच्या संदर्भातले कागदपत्र आणि त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेसंदर्भात पाहणी करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर, ही कारवाई करण्यात आली असे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. खासगी जागामालकांनी अतिक्रमण करून या ठिकाणी हॉटेल आणि घरे उभी केली होती.

जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या समितीचे सदस्य, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, वनक्षेत्र असेल तेथे संबंधित उप वनसंरक्षक संबंधित अधिक्षक पुरतत्वविद्या, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण भारत सरकार, पुरातत्व सहाय्यक संचालक विभागीय कार्यालय महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, निवासी उप जिल्हाधिकारी या समितीने आढावा




घेऊन कोणकोणत्या गड-किल्ल्यांवर अतिक्रमणे आहेत. याची किल्लानिहाय यादी तयार केली होती. सर्व अतिक्रमणे हटविल्यानंतर पुनःश्च त्याठिकाणी अतिक्रमणे होणार नाहीत. याची दक्षता याच समितीने घ्यायची आहे. समितीची बैठक दरमहा आयोजित करुन अहवाल शासनास सादर करावा लागणार आहे.

### ट्रेकिंगसाठी येणाऱ्या पर्यटकांनाही बंदी

» ही कारवाई करण्यासाठी वन विभागाच्या वतीने कारवाई करण्यापूर्वी कमालीची गुप्तता पाळली होती. सध्या परिसरात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. अतिवृष्टी पुढील काही दिवस राहणार असल्याबाबत हवामान खात्याने सतर्कतेचा इशारा दिलेला. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आणि गुरुवार, २९ मे २०२५ रोजी होणाऱ्या आपत्ती निवारणाच्या शासकीय पाहणी दौऱ्याच्या अनुषंगाने, सिंहगड किल्ला बंद ठेवण्यात येणार आहे.

### समिती गठित

» केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि सुमारे ३०० असंरक्षित गड किल्ल्यांच्या ठिकाणी अतिक्रमण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. यामुळे केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड किल्ले यांच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणे, वास्तुच्या सौंदर्यास बाधा पोहोचू नये, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनांनुसार जिल्हा स्तरावरील केंद्र व राज्य संरक्षित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.